# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २६/०६/२०२५ (गुरूवार)

---

## नागपुर ग्रामीण जिल्हयात जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिनानिमित्य ६४. ८० कि.ग्रॅ. अंमली पदार्थ गांजा नाश करण्यात आला.

**आज दिनांक २६/०६/२०२५ रोजी जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिवस असल्याने मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या उपस्थितीत नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत एन.डी.पी.एस. कायदयान्वये दाखल २८ गुन्हयातील मुद्देमाल ६४. ८० कि.ग्रॅ. अंमली पदार्थ गांजा पंचानामा कार्यवाही करून बुटीबोरी येथील Maharashtra Enviro Powar Limited या कंपनीमध्ये नाश करण्यात आला आहे.** पोलीस स्टेशन केळवद – १ गुन्हा , सावनेर – ४ गुन्हे, कळमेश्वर– ३ गुन्हे, भिवापुर – २ गुन्हे, उमरेड – १ गुन्हा, कुही– १ गुन्हा खापरखेडा – ५ गुन्हे, मौदा – १ गुन्हा, पारशिवणी – ४ गुन्हे, देवलापार – १ गुन्हा ,रामटेक – १ गुन्हा ,नरखेड – १ गुन्हा , कोंढाळी – १ गुन्हा, बोरी १ गुन्हा ,एमआयडीसी बोरी – १ गुन्हा अशा २८ गुन्हयातील मुद्देमाल नाश करण्यात आला आहे.

सदर वेळी श्री रमेश धुमाळ, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री दिपक अग्रवाल, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, नागपुर विभाग, श्री ओमप्रकाश कोकाटे, पोलीस निरीक्षक, स्था.गु.शा नागपुर ग्रामीण जिल्हा, यांच्या सह स्थानिक गुन्हे शाखेचे अंमलदार हजर होते.









# नागपुर ग्रामीण जिल्हयात नशामुक्त भारत अभियानाअंतर्गत घेण्यात आले विविध कार्यक्रम

**पोलीस स्टेशन मौदा** :— दिनांक २४/०६/२०२५ रोजी पोलीस स्टेशन मौदा हद्दीतील जनता महाविदयालय येथे तसेच दिनांक २६/०६/२०२५ रोजी ज्ञानगंगा हायस्कुल, मौदा आणि शिर्डी साई पब्लीक स्कुल, मौदा येथे मौदा पोलीसांनी नशामुक्त भारत अभियानाअंतर्गत कार्यक्रम घेवुन विदयार्थ्यांना मार्गदर्शन केले. शाळा, महाविदयालयातील विदयार्थ्यी कोणत्याही प्रकारच्या वाईट व्यसनाच्या अहारी जावु नये. तसेच तरूण/तरूणींमध्ये वाईट व्यसनाचे प्रमाण कमी व्हावे या दृष्टीने सदर कार्यक्रम घेण्यात आला आहे. सदर कार्यक्रमामध्ये पोलीस निरीक्षक, श्री सारिन दुर्गे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन मौदा आणि पोलीस उपनिरीक्षक, श्री जगने, पोलीस स्टेशन मौदा यांनी उपस्थित शाळेच्या विदयार्थ्यांना जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिवस निमित्ताने जनजागृतीपर मार्गदर्शन केले.

**तसेच दिनांक २६/०६/२०२५ रोजी मौदा शहरात अंमली पदार्थ विरोधी दिवस निमित्ताने जनजागृती पर रॅली काढण्यात आली. सदर रॅलीत शाळेतील विदयार्थ्यांनी सहभाग घेतला होता.**




Mauda Nagpur Division 2025.06.26 12:38


Mauda Nagpur Division 2025.06.24 11:41


SAI PUBLIC SCHOOL
COLLEGE MOUDA
अमली पदार्थ मुक्त जिल्हा
आपला नागपूर ग्रामीण
जनजागृती अभियान
SHIRDI SAI



## पोस्टे भिवापुर :—

दिनांक २६/०६/२०२५ रोजी **भिवापूर महाविद्यालय,भिवापूर** येथे भिवापुर पोलीसांनी नशामुक्त भारत अभियानाअंतर्गत कार्यक्रम घेवुन विदयार्थ्यांना मार्गदर्शन केले. **सहा.पोलीस निरीक्षक श्री जयप्रकाश निर्मल, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन भिवापुर यांनी अंमली पदार्थाचे दुष्परीणाम सांगुन** उपस्थित शाळेच्या विदयार्थ्यांना जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिवस निमित्ताने जनजागृतीपर मार्गदर्शन केले.



**पोस्टे काटोल:—**

दिनांक २६/०६/२०२५ रोजी **कन्सेप्ट स्कूल, कोचिंग क्लासेस, काटोल** येथे काटोल पोलीसांनी नशामुक्त भारत अभियानाअंतर्गत कार्यक्रम घेवुन विदयार्थ्यांना मार्गदर्शन केले. **पोलीस उपनिरीक्षक श्री कृष्णा गोगले, पोलीस स्टेशन काटोल यांनी अंमली पदार्थाच्या सेवनामुळे होणारे दुष्परिणाम व त्याच्या सेवनामुळे होणारे नुकसान याबाबत माहीती देवुन** विदयार्थ्यांना जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिवस निमित्ताने  जनजागृतीपर मार्गदर्शन केले.



**पोस्टे सावनेर:—**

दिनांक २६/०६/२०२५ रोजी **अदानी कंपनी, मानेगाव** येथे सावनेर पोलीसांनी नशामुक्त भारत अभियानाअंतर्गत कार्यक्रम घेवुन **अदानी कंपनीतील** कर्मचाऱ्यांना **पोलीस उपनिरीक्षक श्री स्वप्नील गेडाम, पोलीस स्टेशन सावनेर यांनी अंमली पदार्थाच्या सेवनामुळे होणारे दुष्परिणाम व त्याच्या सेवनामुळे होणारे नुकसान याबाबत माहीती देवुन** जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिवस निमित्ताने  जनजागृतीपर मार्गदर्शन केले.




**पोस्टे खापरखेडा:—**

दिनांक २६/०६/२०२५ रोजी भवन्स स्कूल नांदा येथे खापरखेडा पोलीसांनी नशामुक्त भारत अभियानाअंतर्गत कार्यक्रम घेवुन विदयार्थ्यांना मार्गदर्शन केले. **सहा पोलीस निरीक्षक श्रीमती स्वाती यावले, पोलीस स्टेशन खापरखेडा यांनी अंमली पदार्थाच्या सेवनामुळे होणारे दुष्परिणाम व त्याच्या सेवनामुळे होणारे नुकसान याबाबत माहीती देवुन** विदयार्थ्यांना जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिवस निमित्ताने जनजागृतीपर मार्गदर्शन केले.




## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
## ८ गोवंश जनावरांची सुटका,भिवापुर पोलसांची कामगिरी
## २ आरोपी अटक

**पोलीस स्टेशन भिवापुर** :— दिनांक २५/०६/२०२५ रोजी भिवापुर पोलीस अवैध धंदयावर कारवाई करणेकामी पेट्रोलींग करीत पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, नागपुर ते भंडारा रोड वर अवैधरित्या जनावरांची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी नागपुर ते भंडारा रोडवर समर्थ पेट्रोलपंप जवळ नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान **पिकअप वाहन क्रमांक एम. एच. १९ बी.एफ. ५०८५ आणि वाहन क्रमांक एम. एच. ४८ ए.जी २६५०** असे दोन वाहन मिळुन आले. पोलीसांनी वाहन थांबवुन चालकांना नाव पत्ता विचारले असता पिकअप वाहन क्रमांक एम. एच . १९ बी. एफ. ५०८५ चा चालक आरोपी नामे दिनेश दुर्याधन लोखंडे, वय

४५ वर्षे, रा. कोंडा कोसरा, बाजार टोली, ता. पवनी, जि. भंडारा आणि वाहन क्रमांक एम एच ४८.ए.जी २६५० चा चालक नामे सुनिल मधुकर भाजीपाले, वय ४२ वर्षे, रा. कोंडा बाजार चौक ता पवनी जि.भडारा अशी माहीती समजली. पोलीसांनी वाहनाची तपासणी केली असता पिकअप वाहन क्र .एम एच १९ बी. एफ. ५०८५ मध्ये ४ गोवंश जनावरे आणि वाहन क्रमांक एम. एच. ४८ ए. जी. २६५० मध्ये ४ गोवंश जनावरे असे एकुण ८ मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून एक पिकअप वाहन क्रमांक एम. एच . १९ बी. एफ. ५०८५ किंमती ४,००,०००/— रूपये, वाहन क्रमांक एम एच ४८.ए.जी २६५० किंमती ४,५०,०००/— रूपये आणि **८ गोवंश जनावरे** किंमती १,५०,००० /— रूपये एकुण किंमती **१०,००,०००/— रूपयांचा मुददेमाल जप्त केला.**

**नमुद प्रकरणी आरोपी नामे दिनेश दुर्याधन लोखंडे, वय ४५ वर्षे, रा कोंडा कोसरा, बाजार टोली, ता. पवनी जि. भंडारा आणि सुनिल मधुकर भाजीपाले, वय ४२ वर्षे रा. कोंडा बाजार चौक ता पवनी जि. भंडारा याच्या विरूध्द महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम सहकलम प्राण्यांचा छळ अधिनियम सहकलमा मोटर वाहन अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे. दोन्ही आरोपीस अटक करण्यात आली आहे.**

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद भिवापुर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन भिवापुर** :— दिनांक २६/०६/२०२५ रोजी भिवापुर पोलीस पो.स्टे. हददीत पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, निलज कडुन भिवापुर मार्गे उमरेड कडे अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी तास कॉलनी शिवार येथे नाकाबंदी केली असता संशयीत वाहन अशोक लेलॅंड १६ चक्का ट्रक क्रमांक एम. एच. ३५ ए.जे. १८२२ हे मिळुन आले. वाहन थांबवुन वाहन चालकाला नाव पत्ता विचारला असता, **अमीर खान जमीर खान पठाण, वय ३२ वर्षे, रा. बाबा मस्तान शाह वार्ड, ता.जि भंडारा ह.मु सायका नगर, अडयाळ ता पवनी जि**

**भंडारा** अशी माहीती प्राप्त झाली त्याला परवान्याबाबत विचारणा केली असता त्याने त्याच्या कडे परवाना नसल्याचे सांगितले. वाहन मालकाबाबत विचारपुस केली असता, वाहन मालकाचे नाव **फुरकान अब्दुल लतिफ शेख, रा. घोटी, गोरेगाव ता. जि. गोंदीया याचे सांगण्यावरून अवैध रेतीची वाहतुक करीत असल्याची माहीती झाली.** वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन पोलीसांनी पंचासमक्ष ट्रक मधुन १) ७ ब्रास रेती किंमती ३५,०००/रूपये आणि २) ट्रक क्रमांक एम. एच. ३५ ए.जे. १८२२ किंमती ३०,००,०००/—रूपये असा **एकुण ३०,३५,०००/— रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.**

सदर प्रकरणी वाहन चालक आणि मालक याच्या विरूध्द पोस्टे भिवापुर येथे कलम ३०३(२), ४९(२) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) म.ज.म. संहीता सहकलम ४.२१. खान खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंध अधिनियम, सहकलम १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



## अवैध शस्त्र बाळगणाऱ्या अरोपीविरूध्द गुन्हा नोंद

पो.स्टे. कन्हान :— दिनांक २५/०६/२५ रोजी कन्हान पोलीसांना गोपनिय माहीती मिळाली की टेकाडी पुलालगत, राकेश यादवचे चायनिज चे दुकानाजवळ एक इसम सार्वजनिक ठिकाणी हातात चाकु घेवुन फिरत आहे. मिळालेल्या माहीतीनुसार पोलीस तात्काळ नमुद घटनास्थळी पोहचले. तेथे एक संशयीत इसम मिळुन आला.त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता रामकृष्णा नत्थु कठाने, वय ३३ वर्षे, रा.गोंडेगाव कॉलोनी कॉटर नं. ११/०७ कन्हान ता. पारशिवनी अशी माहीती समजली. नमुद इसमाची पंचसमक्ष अंगझडती घेतली असता त्याचे जवळ कमरेत एक मोठे चाकु सारखे लोखंडी धारदार शस्त्र मिळुन आले. सदर धारदार शस्त्र पंचासमक्ष जप्त करण्यात आले.

**आरोपी नामे रामकृष्णा नत्थु कठाने, वय ३३ वर्षे, रा.गोंडेगाव, कॉलोनी कॉटर नं. ११/०७ कन्हान, ता. पारशिवनी याच्या विरूद्ध पोस्टे कन्हान येथे कलम ४/२५ शस्त्र अधिनियम १९५९ सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे**

## अवैधरित्या देशीदारू, मोहाफुल दारू बाळगणा—या/विक्री करणाऱ्या आरोपीतांवर,नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई, १८ आरोपीविरूध्द गुन्हे नोंद एकुण १५९२५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त

नागपुर ग्रामीण जिल्हयात **दिनांक २५/०६/२०२५** रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशन अंतर्गत पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन **देशी दारू, मोहाफुल दारू असा एकुण १५,९२५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

**पोलीस स्टेशन काटोल येथे आरोपी क्रं १.** रविकुमार येलल्या उत्कमवार, रा. खानगाव, ता. काटोल, जि. नागपुर **आणि क्रं २.** राधेश्याम तात्या मोहबे, रा. सोनोली ता. काटोल जि. नागपुर यांचेवर, **पोलीस स्टेशन जलालखेडा** अंतर्गत आरोपी क्रं १ राजेन्द्र जर्नाधन पवार, वय ४९ वर्ष, रा. हिवरमंठ, ता. नरखेड, आणि क्रं २. आरोपी नामे ज्ञानेश्वर तुळशीराम सहारे, वय ६२ वर्ष, रा. मोहगावं ढोले, ता. काटोल, आणि महीला आरोपी

यांचेवर, **पोलीस स्टेशन नरखेड** अंतर्गत आरोपी रामदास किसनाची चौरे, वय ४२ वर्षे, रा तिनखेडा याचेवर, **पोलीस स्टेशन कुही** येथे निखील ज्ञानेश्वर बोलाख, वय ५२ वर्षे, रा आजनी, पो. कळमना, ता. कुही, जि. नागपुर याचेवर, **पोलीस स्टेशन वेलतुर** येथे संतोष भाकरूजी देवगडे, वय २५ वर्ष, रा. राजोला, ता. कुही **याचेवर , पोलीस स्टेशन भिवापुर** राजपाल जयपाल श्रीरामे, वय ३५ वर्षे, रा पांढरवाणी, ता. भिवापुर, जि. नागपुर, याचेवर , **पोलीस स्टेशन देवलापार येथे** रामनिवास हिरु पारखी, वय ५३ वर्ष, रा. रयतवाडी, ता. रामटेक, जि. नागपुर याचेवर, **पोलीस स्टेशन कळमेश्वर** येथे आरोपी क्रं १ इसाक मोहम्मद सैयद वय ५० वर्ष रा. वार्ड क्र. ०३ पाण्याची टाकी जवळ गोधनी पोस्ट फेटरी , क्रं २ सुभाष गुरूदास निखारे वय ६२ वर्ष रा खडगाव खदान शिवार आणि आरोपी क्रं ३ सुभाष लूडदास निखारे वय ६४ वर्ष राहणार खळगाव तालुका जिल्हा नागपूर यांचेवर, **पोलीस स्टेशन खापा** येथे राजेश धनराज तागडे, वय ४२ वर्ष, रा. वाकी, ता. सावनेर याचेवर आणि **पोलीस स्टेशन सावनेर** येथे आरोपी नामे निलकंठ तूकाराम बहादूले वय ६३ वर्ष रा. वार्ड क्र . ०३ धापेवाडा , ता. सावनेर आणि दोन महीला आरोपीतांवर, तसेच **पोलीस स्टेशन मौदा** येथे राहुल देवीदासजी भोयर, ३० वर्षे, रा. कडोली, कामठी याचेवर अशा **एकुण १८ आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये १८ गुन्हे दाखल केले आहे.**

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद.

**पोलीस स्टेशन आरोली** :—दिनांक २५/०६/२०२५ रोजी अरोली पोलीसांना गुप्तबातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, अरोली येथे स्मशान भुमी च्या बाजुला काही इसम ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी पोहचले असता आरोपी नामे **१) ओमप्रकाश रोहीदास रोडे, वय ३९ वर्ष, रा. अरोली वार्ड ३ ता.मौदा २) सुरेद्र हरीदास गजभिये, वय ३८ वर्ष, रा. भांडेवाडी ता.मौदा ३)नरेश बळीराम वाघमारे वय ४५ वर्ष, रा. अरोली वार्ड न.१ ता.मौदा** हे ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळतांना मिळुन आले. पोलीसांनी आरोपीतांच्या ताब्यातुन ५२ तास पत्ते व रोख रक्कम १२८०/— रूपये, दोन ॲड्रॉईड मोबाईल असा **एकुण १७,३८० /—** रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नमुद आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन अरोली येथे १२ (अ) म जु का अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने